Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – II March - April 2023

# माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या नवीन प्रवेश वाढीकरिता शिक्षकांसाठी जाणीव जागृतीचा अभ्यास

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. करण राठोड**
**पी. व्ही. डी. टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन, चर्चगेट**

**संशोधिका**
**श्रीमती सुनिता संदीप महाडीक**
**पी. व्ही. डी. टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन, चर्चगेट**

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थी वाढीसाठी केलेल्या शिक्षकांच्या जाणीव जागृतीचा अभ्यास, यामुळे मुंबई उपनगरातील माध्यमिक शाळेतील अनेक शिक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.या प्रतिसादामुळे शिक्षकांच्या विद्यार्थी वाढीसाठी असलेल्या संकल्पना तसेच उपाय या संदर्भातसविस्तर चर्चा व अभ्यास करून पुढील शैक्षणिक वर्षासाठी त्याचा परिणामकारक उपयोग कसा करता येईल, याची कल्पना आली.

सहकारी शिक्षक, व्यवस्थापक, माजी विद्यार्थी ,स्थानिक लोकसहभाग व पालकांकडून सहकार्य घेवून नवीन उपाययोजना व उपक्रम राबविण्यास योग्य दिशा मिळाली.भविष्यात येणाऱ्या अडचणी व समस्यांचे गांभीर्य विचारात घेवून संच मान्यतेवर परिणामी शिक्षक बदली यांच्या परिणामावर काम करण्याची गरज भासू लागली . तसेच विद्यार्थी हाच केंद्रस्थानी असून तो आदर्श, सुजाण भावी नागरिक व देशाच्या उज्ज्वल भविष्याचा पाया आहे, तसाच आपल्या स्वत:च्या व्यवसायाचा ही केंद्रबिंदुआहे ,याचे महत्व पटले.

संचयमान्यतेवर होणार परिणाम आणि विविध होणाऱ्याजिल्ह्यांतर्गत बदल्या याच्या दूरगामी परिणामाची समस्या भेडसावू लागली. .विद्यार्थ्यांची कौटुंबिक आर्थिक परिस्थिती, पालकांची निरक्षरता ही पूर्णतः शिक्षणाच्या आड येत नसून शिक्षक या नात्याने आपण या अडचणीवरपूर्णपणे मात करू शकतो, ही सकारात्मक भावना निर्माण झाली.

शिक्षणासाठी मदत करणाऱ्या अनेक संस्थांची माहिती व त्यांच्या मदतीचे स्वरूप कोणते हे चित्र स्पष्ट झाले. त्यामुळे उत्साह वाढला व अशा प्रकारेया संशोधनामुळे एक नवीन दिशा मिळाली. तसेच नवीन शैक्षणिक वर्षासाठी काम करण्यास एक प्रेरणा मिळाली. सहकारी शिक्षकांच्या सहकार्यानेशाळेत वातावरण निर्मिती करून शाळेतील विद्यार्थी संख्या व शाळेची पटसंख्या वाढवण्यावर नक्कीच याचा फायदा झाला.

CC BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**प्रस्तावना** :

या बरोबरच '**शिक्षण**' ही मानवाची मूलभूत गरज झाली आहे, किंबहुना या सर्व गरजांमध्ये शिक्षण या गरजेला अग्रक्रम द्यावा लागेल. हे शिक्षण सर्वांना मिळावे म्हणून संपूर्ण शिक्षण प्रक्रिया राबवली जाते.

"शाळा" ही शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या त्रिवेणी संगमातून तयार होते. सगळेच घटक हे अविभाज्य असतात, तर विद्यार्थी हा घटक शिक्षक व पालक यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो. भारताच्या

घटनेनुसार शिक्षण घेणे, हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे. मी गेली तीस वर्षापासून अध्ययनाचे कार्य करत आहे. या काळात माझ्या असे लक्षात आले की, आधुनिक युगात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळात मराठी माध्यमाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. समाजाच्या जीवनशैलीचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, मराठी माध्यमाकडे समाजाचा व पालकांचा बघण्याचा जो दृष्टिकोन बदलत आहेती मानसिकता बदलण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर आहे.

शिक्षण व्यक्तीत ज्ञान व कौशल्याचा विकास घडवून आणतअसते. आधुनिकतेसोबतच शिक्षण क्षेत्रातही बरेच बदल घडून येत आहे. पाटी-पेन्सिलची जागा आता विविध इलेक्ट्रॉनिक साधनांनी घेतली आहे. विविध शैक्षणिक क्षेत्रात देखील ई-लर्निंग द्वारे शिक्षणाची गंगा वाहती ठेवत आहे. या नव्या प्रवाहा सोबतनवी पिढी स्वत:हून जात असल्याचे चित्र भारतातही दिसत आहे. याच संधीचा फायदा घेऊन आपल्या शाळेतील विद्यार्थी संख्या वाढीसाठी उपयोग करून घ्यावा असे मी ठरवले.

**संशोधनाची गरज** :

शाळेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. त्यांच्यामध्ये ज्ञानात्मक, भावनात्मक, क्रियात्मक असे आणि यासारखे अनेक बदल होत असतात. परंतु हे बदल सकारात्मक व योग्य दिशेने व्हावे, यासाठी शाळेबरोबरच कुटुंब देखील महत्त्वाचे असते.

**कुटुंब** ही पहिली सामाजिक संस्था. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ आपल्या कुटुंबियांसमवेतसर्वात जास्त भेटीत होतो. त्यातून ते घडत असतात. त्यांच्या या घडण्यांत विकासात कुटुंबाचा आकार, कुटुंबाची शिक्षणाविषयीची आवड व मानसिकता, आर्थिक परिस्थिती या सगळ्या गोष्टींची योग्य सांगड घालणे आवश्यक असते. यामधील एक जरी घटक योग्य प्रमाणात नसेल तरी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात बाधा निर्माण होते. समाजाची मानसिकता बदलण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर असते.

नैतिकता आणि मूल्य हे शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्याची महत्त्वपूर्ण काम शिक्षक करतात. शिक्षण ही समाजात जीवन व समाज परिवर्तन घडवणारी एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. एकूणच विद्यार्थी हा देशाचा कणा आहे. देशाच्या उज्ज्वल परंपरेत व देशाच्या जडणघडणीमधे विद्यार्थ्यांचे योगदान हे अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे.

**संशोधनाचे महत्व :**

कृती संशोधनाचे प्रवर्तक डॉ. कोरे म्हणतात, "आपले निर्णय व उपक्रम यांच्या बाबतीत मार्गदर्शन मिळावे. त्यात सुधारणा व्हाव्या व त्यांचे मुल्यांकन व्हावे, म्हणून शिक्षकांनी आपल्या समस्यांचा शास्त्रीय पध्दतीने स्वत: अभ्यास करण्याची प्रक्रिया म्हणजेच कृतीसंशोधन होय".

प्रस्तुत कृती संशोधनासाठी मी माझी स्वत:ची शाळा निवडलेली आहे. दिवसेंदिवस होणारी विद्यार्थ्यांची गळती, मराठी माध्यमाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन गोष्टी इत्यादी लक्षात घेता योग्य शिक्षण न घेतल्याने अनेक ठिकाणी पिढ्यानपिढ्या आपणास दारिद्र्य पहावयास मिळते. त्यांचे विचार हे जुन्या रूढी-परंपरा भोवती फिरत असतात. अशा घरातून आलेल्या मुलांना शिक्षण हे त्यांचा विकास होण्यासाठी आवश्यक आहे. हे समजण्यासाठी सदर कृती संशोधन दिशा देईल. सदर कृती संशोधनामुळे इतर शाळेतील शिक्षकांना

प्रेरणा मिळेल. तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी तसेच शाळेत नवीन प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या विवीध समस्या लक्षात घेऊन आपण यासाठी काय करावे, याकडे ते जाणीवपूर्वक लक्ष देतील.

**समस्या विधान** :

"मुंबई उपनगरातील आय ई एस मराठी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या नवीन प्रवेश वाढीकरिता शिक्षकांसाठी जाणीव जागृतीचा अभ्यास."

**संशोधनाची कार्यात्मक व्याख्या**

1) मुंबई - एक भौगोलिक प्रदेश .
2) उपनगर - मुंबई या भौगोलिक प्रदेशाचा ठराविक लोकसंख्येचा गट .
3) माध्यमिक- 10+2+3 या रचनेनुसार प्राथमिक विभाग व महाविद्यालयीन विभाग यामधील भाग होय.
4) नवीन प्रवेश -.शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी नवीन शैक्षणिक वर्षात घेतलेल्या इयत्तेतील प्रवेश.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) मुंबई उपनगरातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेश वाढीकरिता शिक्षकांसाठी जाणीव जागृतीचा अभ्यास करणे
2) मुंबई उपनगरातील विद्यार्थ्यांच्या नवीन प्रवेश वाढीकरिता लिंगानुसार जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.
3) मुंबई उपनगरातील विद्यार्थ्यांच्या नवीन प्रवेशासाठी शिक्षकांनी केलेल्या जाणीव जागृतीचा अभ्यास करणे
4) मुंबई उपनगरातील विद्यार्थ्यांच्या नवीन प्रवेशासाठी शिक्षकांचा दृष्टीकोन अभ्यासणे .

**गृहितके:**

१) पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, ही शिक्षकांची संपूर्णत: जबाबदारी आहे.
२) शिक्षणाचे महत्त्व देशाचे शिक्षणातून देशाचे भवितव्य उज्ज्वल करण्यास मदत होते तसेच आदर्श, सुजाण नागरिक घडवून विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजांचे व मानसिकतेचे विश्लेषण करून शैक्षणिक प्रगती साधता येते.

**संशोधनाची व्याप्ती:**

१) प्रस्तुत संशोधन कार्य मुंबई उपनगरातील कांदिवली चारकोप भागात असलेल्या इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक शाळेतील आहे. या संशोधनासाठी माझ्या परिसरातील शाळेतील शिक्षकांचा समावेश आहे.
२) प्रस्तुत संशोधनासाठी इतर कोणत्याही माध्यमाच्या शाळांचा समावेश केला गेला नाही.

३) प्रस्तुत संशोधन फक्त माध्यमिक विभागासाठी असून आय ई एस माध्यमिक शाळेसाठीच आहे, इतर शाळांच्या उपयोगासाठी केलेला नाही.

**संशोधनाची मर्यादा :**

१) प्रस्तृतकृती संशोधन हे मराठी माध्यमातील अनुदानित शाळेसाठीच केले जाणार आहे .

२) प्रस्तृत संशोधनात मुंबई उपनगरातीलच माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा सहभाग असून नवीन प्रवेश वाढीकरिता शिक्षकांमधील जाणीव जागृतीचा अभ्यास करण्यापुरतेच मर्यादित आहे.

३) सदर संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2021-23 वर्षासाठीच मर्यादित आहे .

४) प्रस्तुत संशोधन हे मुंबई उपनगरातील चारकोप येथील आय ई एस शाळेतील मराठी माध्यमिक विभागासाठीच मर्यादित आहे.

**भारतातील संशोधन साहित्य :**

**अ) श्रीमती मृदुला गांगल (१९९३)**"A study of the effects of some Social- Economic factors on self-image creative thinking and achievement of pupils".

**संशोधनाची उद्दिष्टे** :

१. मराठी माध्यमाच्या प्रवेश वाढीकरिता होणारा परिणाम अभ्यासणे.

२. विद्यार्थ्यांना व पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.

३. शाळेतील विद्यार्थी संख्या वाढीकरिता शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नाचा अभ्यास करणे.

४. शिक्षकांची विद्यार्थी संख्या वाढीसाठी असलेली मानसिकता व पूर्वतयारी अभ्यासणे.

**संशोधनाचे निष्कर्ष** :

१. पालकांच्या शिक्षणाचा परिणाम हा विद्यार्थ्यांवर होतो.

२. शिक्षणाविषयी जागरुकता निर्माण होते.

३. शिक्षणाचे महत्व व त्याचा स्वत:च्या व्यक्तिमत्वावर होणारा परिणाम दिसून येतो.

४. कुटुंबाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती ही विद्यार्थ्यांच्या नवनिर्मितीवर परिणाम करते.

**आ) श्रीमती नीलोफर एम. जीवान(१९९१)**"An investigation into the study of scholastic back word as found Std. VII, VIII, IX among 10 unaided".

**संशोधनाची उद्दिष्टे** :

१. शालेय शिक्षण व पालकांची मानसिकता यांचा परस्पर संबंध ठेवणे

२. शिक्षणाविषयी जागरूक नसलेल्या विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्यास शोध घेणे

३. परिसरातील शिक्षक यांना असलेली विद्यार्थी संख्या वाढीसाठी असलेली जाणीव अभ्यासणे.

४. शालेय उपक्रमांची माहिती करून घेणे व अभ्यासणे.

५ . शाळेत प्रवेश न घेणाऱ्या कारणांचा शोध घेणे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – II March - April 2023

६. शालेय व सरकारी विवीध योजनांची व सुविधांची माहिती करून देणे.

**संशोधनाचा निष्कर्ष:**

१. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची कौटुंबिक परिस्थिती व अभ्यासातील अप्रगतपणा यांचा सहसंबध शोधून घेणे.

२. पालकांचे वारंवार होणारे स्थलांतर याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम यातील सह संबंध शोधणे.

**संशोधन पद्धतीची निश्चिती :**

प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे सर्वेक्षणात संबंधित असलेल्या विविध बाबींची सद्यस्थिती त्यातील आवश्यक बदल आणि त्याकरिता इष्ट असलेले उपाय यांच्या संशोधनाचा अंतर्भाव होतो. संशोधनाचा प्रमुख हेतू नवे ज्ञान प्राप्त करणे विद्यमान तथ्याबद्दल नवीन दृष्टिकोन प्रस्तुत करणे.

**न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधन न करता मी इंडियन एज्युकेशन सोसायटी च्या माध्यमिक शाळा चारकोप या शाळेची निवड केलेली आहे.आय ई एस च्या माध्यमिक शाळा, चारकोप, कांदिवली येथील विद्यार्थ्यांच्या नवीन प्रवेश वाढीसाठी करण्यात येणाऱ्या विविधउपाय योजनांचा अभ्यास करून त्यावर आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यासाठी सदर प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पासाठी परिसरातील काही शाळांमधील शिक्षकांशी चर्चा करण्यात आली. तसेच गुगल फॉर्म (प्रश्नावली) च्या सहाय्याने त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला व विचार विनिमय केला गेला. य प्रश्नावलीव्दारे ५२ शाळांतील शिक्षकांनी प्रतिसाद दिला. अशा प्रकारे या ५२ शाळांची निवड मी नमुना म्हणून केली.

**संशोधनाची साधने:**

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने आपल्या मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनानुसार प्रश्नावली तयार केली आहे. संशोधन समस्येनुसार शाळेतील विद्यार्थी संख्या वाढण्यासाठी शिक्षकांच्या बाबतीतशिक्षकांची जागृती व विद्यार्थी व शाळेसंदर्भात जागरूकता पाहण्याचा दृष्टिकोन विषयक प्रश्नावली तयार करण्यात आलेली आहे. संशोधकाने संशोधनासाठी जो विषय निवडला आहे. त्या संबंधात विवीध प्रकारचीमाहिती गोळा करण्यासाठी अनेक साधने उपलब्ध होती. त्यापैकी संशोधकाने खालील नमूदकेलेली साधने निवडली आहे. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी आवश्यक माहिती मिळवण्यासाठी संशोधन साधन म्हणून प्रश्नावलीचा उपयोग केला आहे.


**संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही :**

सदर कृती संशोधनासाठी निवडलेल्या सर्वेक्षणातून ५२ शाळांतील शिक्षकांनी या प्रतिसादातून निष्कर्षाचे मुल्यांकन केले आहे. त्यासाठी गुगल फॉर्म व्दारे प्रश्नावली तयार करण्यात आली व प्रश्नावलीचा वापर केला

गेला.प्रस्तुत प्रश्नावलीत शिक्षकांची विद्यार्थी संख्येबाबत असलेली जागृती व त्यांचा दृष्टिकोन विषयक प्रश्नावली देण्यात आली व या प्रश्नावलीच्या सहाय्याने आधारभूत माहिती संकलित केली संकलित केली तसेच संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले व निष्कर्ष काढण्यात आले.

**संकलित माहितीचे विश्लेषण उद्दिष्टानुसार :**

**मुंबई उपनगरातील माध्यमिक शाळेतील नवीन प्रवेश वाढीसाठी शिक्षकांनी शालेय स्तरावर कोणते उपक्रम राबवविले आहेत?**




**अर्थनिवर्चन:**

**एकूण ५२ शिक्षकांच्या माहितीच्या आधारे सादर संशोधनाची माहिती खालील प्रमाणे :** सर्वेक्षण प्रश्नावली मधील नवीन प्रवेश वाढीकरीता शालेय स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांची कल्पना दिली होती. यामध्ये **शाळा प्रवेशोत्सव** या उपक्रमास 48.1% प्रतिसाद तर, गृहभेट या उपक्रमास 29.6% प्रतिसाद व आनंद मेळावा या उपक्रमास 22.2% असा प्रतिसाद मिळाला आहे .
सामुदायिक वाढदिवसया उपक्रमास अजिबात प्रतिसाद मिळालेला नाही.


**निष्कर्ष :**

यावरून असा निष्कर्ष निघतो की,एकूण ५२ शिक्षकांच्या माहितीच्या आधारे नवीन प्रवेश वाढीकरता विद्यार्थ्यांना व पालकांना आकर्षित करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव हा एक उत्तम उपक्रम असून सामुदायिक वाढदिवस यास कुणाचेही कोणीही सहमत नाही आणि त्या उपक्रमांचा नवीन प्रवेश वाढीकरता कोणत्याही प्रकारे फायदा होणार नाही असं सर्वांचे मत दिसून येते.

**सामुदायिक वाढदिवस** ही संकल्पना बहुदा कुणाला रुचलेली नसून त्यामुळे शाळा प्रवेश करता फायदा होणार नाही, असा समज असावा.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – II March - April 2023

**मुंबई उपनगरातील माध्यमिक शाळेतील नवीन प्रवेश वाढीसाठी विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते.?**




**अर्थनिवर्चन:**

वरील सारणी वरून एकूण ५२ शिक्षकांच्या माहितीच्या आधारे नवीन प्रवेश वाढीकरता विद्यार्थ्यांच्या बाबतीत शिक्षकांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, यामधे शिक्षकांनी वरील सर्व या पर्यायाला 29.6% असा प्रतिसाद देऊन स्कूल बस व्यवस्था यास 7.4% आणि शालेय गणवेश व शाळा व घर यामधील अंतर यास समान प्रतिसाद म्हणजेच 25.9% असा आहे.शाळेची वेळ याला 11.1% असा प्रतिसाद आहे

**निष्कर्ष :**

यावरून असा निष्कर्ष येतो की नवीन प्रवेश वाढीकरता साधारण शालेय फी व गणवेश, आणि शाळा व घर यामधील अंतर यातील प्रतिसाद थोड्याफारकाचाच आहे. शाळेची वेळ व स्कूल बस व्यवस्था ही अडचण प्रकर्षाने जाणवत नसावी

**संशोधनाचे निष्कर्ष :**

मराठी भाषा ही मराठी माध्यमांच्या शाळांच्या अस्तित्वाचा कणा आहे. त्यामुळे मराठी शाळा ह्या टिकल्या पाहिजेत. अशा परिस्थितीत इंग्रजी शाळांचे मराठी शाळांवर होणारे आक्रमण रोखण्यासाठी व मराठी माध्यमाच्या शाळा वाचविण्यासाठी मराठी माध्यमिक विभागाने प्रयत्न सुरू केले आहेत. दरम्यान माध्यमिक विभागातील आय ई एस चारकोप शाळेतील माझ्या सहकारी शिक्षकांनी शाळेच्या आसपासच्या भागात घरोघरी फिरून पालकांचे जनजागरण करण्याचा मार्ग अनुसरला आहे. शहरातील शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या रिक्षांवर शाळा प्रवेशाच्या जाहिरातींचे फलक लावण्यात आले आहेत.

मराठी शाळांमध्ये सेमी इंग्रजी व इंग्रजी विषय प्रभावीपणे शिक्षण शिकवण्याचे शाळेने ठरवले आहे. त्याप्रमाणे आणखी काही उपक्रम राबवून मराठी शाळांचे अस्तित्व वाचवून त्यांना उर्जितावस्था प्राप्त करून देण्याचा मनोदय शाळा व्यवस्थापनाने व्यक्त करीत मराठी भाषिक कुटुंबे मराठी शाळांमध्ये प्रवेश घेण्याला प्राधान्य देतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

**शिफारशी :**

शिक्षण सर्वांना मिळावे म्हणून संपूर्ण शिक्षण प्रक्रिया राबविले जाते .त्यातील अनेक महत्त्वाच्या घटकांपैकी शिक्षक हा महत्त्वाचा घटक .शिकवण्याचे काम करणारा तो शिक्षक अशी सहज सोपी व्याख्या शिक्षकाची केली जाते. गेल्या काही वर्षांत इंग्रजी माध्यमाच्या, खाजगी शाळा वाढल्यानंतर त्याचा सरकारी मराठी शाळांना फटका बसू लागला आहे. अनेक शाळांची गुणवत्ता असूनही केवळ मराठी माध्यमामुळे या शाळांमध्ये प्रवेश कमी होत आहेत. तसेच ५० वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात नावाजलेल्या संस्थांच्या अनुदानित, विशेषत: मराठी माध्यमाच्या शाळांचीही विद्यार्थीसंख्या झपाटय़ाने घटत आहे. त्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी संख्या टिकवण्याचे आव्हान शाळांसमोर व शिक्षकांसमोर आहे. त्यावर उपाय म्हणून उन्हाळ्याच्या सुटीत शिक्षक विद्यार्थ्यांचा शोध घेऊन पटसंख्या वाढवण्याचे काम करत आहेत

**पुढील संशोधनासाठी दिशा :**

1) शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेश वाढीसाठी शिक्षकांच्या जाणीव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास.
2) डी. एड अभ्यासक्रमातील नवीन प्रवेश वाढीसाठी शिक्षकांच्या जाणीव जागृतीचा अभ्यास.

**संदर्भ सूची:**

१) प्रा. सौ. स्वाती गाडगीळ (२००५) :कृति संशोधन व नवीन उपक्रम सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.
2) आगलावे, प्रदीप (२००६): “संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे”, विद्या प्रकाशन ,नागपूर,
3) गो. वि. भाटवडेकर (२००७):राजहंस व्यावसायिक प्रकाशन, मराठी शब्दकोश